**Q.P. Code : 08008**

**वेळ: २½ तास** **एकूण गुण :७५**

सूचनाः १) **सर्व** प्रश्न सोडविणे **आवश्यक** आहे.
२) **उजवीकडील अंक गुण** दर्शवितात.

१. साहित्याच्या स्वरूपाविषयीचा प्लेटोचा अनुकृतिसिद्धांत स्पष्ट करा. **१५**

**किंवा**

कोलरिज, एडगर अलन पो व वर्डस्वर्थ यांच्या काव्यव्याख्यांचा परामर्श घ्या.

२. साहित्यभाषेसंबंधीच्या 'प्रतिमा' व 'रूपक' या संकल्पनांची चर्चा करा. **१५**

**किंवा**

पाश्चात्य साहित्यशास्त्रातील साहित्यभाषेसंबंधीच्या 'अपरिचितीकरण' व 'नियमोल्लंघन' या संकल्पनांचा परिचय करून द्या.

३. साहित्यनिर्मिती प्रक्रियेसंबंधी कोलरिजने सांगितलेला कल्पनाशक्ती सिद्धांत विशद करा. **१५**

**किंवा**

'आत्माविष्कार' व 'जीवनभाष्य' या साहित्यप्रयोजनांची चर्चा करा.

४. 'कॅथर्सिस' संकल्पनेविषयीच्या विविध अर्थांचा परामर्श घ्या. **१५**

**किंवा**

आय. ए. रिचर्डस्‌च्या प्रेरणासंतुलन सिद्धांताची चर्चा करा.

५. (अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.(कोणतेही **पाच**) **१०**

१. ॲरिस्टॉलने लिहिलेल्या ग्रंथाचे नाव सांगा.
२. अर्नोल्डने सांगितलेली काव्य व्याख्या लिहा.
३. प्रतिक म्हणजे काय, ते सांगा.
४. अनेकार्थता म्हणजे काय, ते सांगा.
५. 'बायोग्राफिया लिटरारिया' हा ग्रंथ कोणी लिहिला?
६. साहित्यक्षेत्रातील 'लिटरेचर ऑफ कमिटमेंट' या संकल्पनेची मांडणी कोणी केली?
७. 'कॅथार्सिस' च्या संदर्भात विरेचनवादी भूमिका कोणी मांडली?
८. लौकिक जीवनातील अनुभव व कलानुभव यांच्यातील भेदाविषयी कोणी चर्चा केली आहे?

(आ) योग्य पर्याय निवडा. **०५**

१. प्लेटोने खालीलपैकी कोणत्या दृष्टिकोनातून कलेवर आक्षेप घेतला?
(अ) नैतिक (आ) मानसिक (इ) शारीरिक (ई) आर्थिक

२. ॲरिस्टॉटलने अनुकृतीचे किती प्रकार मानले आहेत?
(अ) एक (आ) दोन (इ) तीन (ई) पाच

३. साहित्याच्या भाषेसंबंधी विल्यम एम्पसनने कोणती संकल्पना मांडली?
(अ) अनेकार्थता (आ) नियमोल्लंघन (इ) अपरिचितीकरण (ई) प्रतीक

४. कोलरिजने कल्पनाशक्तीचे किती प्रकार मानले आहेत?
(अ) चार (आ) तीन (इ) दोन (ई) पाच

५. 'साहित्याच्या आस्वादामुळे मानवी इच्छा व प्रेरणा यांचे समाधान होते' ही भूमिका कोणी मांडली?
(अ) ॲरिस्टॉटल (आ) रिचर्डस (इ) प्लेटो (ई) कोलरिज

-----------------------------

03572A8139B2D24F2EA88ADCF7F1BE5B